शासकीय प्रयोजनार्थ ~~

क्र.कावि/अ.का./सा.आस्था/कक्ष-1/ 66 /2017
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक :- 27 /03/2017

प्रति,

श्री.हुरडे उमेश भगवान,
मु.पो.पुंडलीक नगर, वार्ड नं.15,
चिखली ता.चिखली,
जि.बुलडाणा.

विषय :- <u>तलाठी भरती प्रकिया - 2016</u>
तलाठी पदावर झालेली निवड रद्द करणेबाबत.

संदर्भ :-1 तलाठी पदाची अंतिम निवड यादी दिनांक 27/12/2016
2 या कार्यालयाचे पत्र दिनांक 28/12/2016
3 उपविभागीय अधिकारी, मलकापुर यांचे पत्र क्रं.कावि/त.आस्था/225/2017 दि.8/02/2017
4 या कार्यालयाचे पत्र दिनांक 27/02/2017

--- 000 ---

उपरोकत विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, तलाठी भरती प्रकिया - 2016 अंतर्गत तलाठी या पदावर इ.मा.व. सर्वसाधारण संवर्गातुन आपली अंतिम निवड झाल्यामुळे या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भिय पत्र दिनांक 28/12/2016 नुसार आपणास मलकापुर उपविभागाध्ये तलाठी या पदासाठी नियुक्तीबाबत शिफारसपत्र निर्गमित करण्यात आले आहे. परंतु सदर पदाच्या निवडीबाबतचे शिफारस पत्र निर्गमित करुन 1 महिन्यापेक्षा जास्त कालावधी पुर्ण होऊनसुध्दा आपण तलाठी या पदावर रुजु झालेले नाहीत असे उपविभागीय अधिकारी मलकापुर यांनी त्यांचे पत्र दिनांक 08/02/2017 नुसार या कार्यालयास कळविलेले आहे.

त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र दिनांक 27/02/2017 नुसार आपणास उपविभागीय कार्यालय मलकापुर येथे तलाठी या पदावर तात्काळ रुजु होण्याबाबत तसेच आपण रुजु होत नसल्यास त्याबाबतचे कारण लेखी स्वरुपात या कार्यालयास 8 दिवसाचे आत सादर करण्याबाबत कळविलेले होते. तसेच सदर पदावर रुजु होत नसल्याबाबतचे लेखी कारण आपण दिलेल्या मुदतीत सादर न केल्यास तलाठी पदासाठी आपली झालेली निवड रद्द करण्यात येईल व सदर पदाबाबत आपणास कोणताही दावा अथवा हक्क प्रस्तावित करता येणार नाही असे सुध्दा कळविण्यात आलेले होते. परंतु आपण 8 दिवसाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतरही उपविभागीय कार्यालय मलकापुर येथे रुजु झालेले नाहीत, तसेच रुजु न होण्याचे लेखी कारणसुध्दा या कार्यालयास कळविलेले नाही. त्यामुळे सदर पदावर आपण रुजु होण्यास इच्छुक नसल्याचे दिसुन येत असल्यामुळे आपली तलाठी या पदावर इतर मागासवर्ग (सर्वसाधारण) या प्रवर्गातुन झालेली निवड रद्द करण्यात येते आहे. यापुढे सदर पदावर आपणास कोणताही हक्क अथवा दावा प्रस्तापित करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती,तथा
जिल्हाधिकारी बुलडाणा